**वादी साक्षीदार क्र.२ हजर**

**वादीतर्फे साक्षीदाराचा अतिरिक्त सरतपास शपथेवर सुरु विधिज्ञ श्री. एस.एल.घोगरे यांच्यामार्फत**

०१. मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र पूर्ण वाचुन समजुन दाखल केले आहे, त्यावर माझी सही आहे. आता मला दाव्यातील मुळ खरेदीदस्त क्र. ३५०८/२००२ दिनांक ११.०६.२००२ रोजीचा दाखवला. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी लिहुन घेणार म्हणुन सही आहे व साक्षीदार म्हणुन संजय गोरे व दत्तु तुकाराम आदनाक यांच्या सहया आहेत. तसेच लिहुन देणार म्हणुन श्रीहरी शिवदास अदनाक यांची सही आहे. सदर दस्तातील मजकुर बरोबर आहे. सदर मुळ खरेदीदस्त क्र. ३५०८/२००२ **निशाणी क्र. ७०** देण्यात येते. सदर खरेदीखताआधारे फेरफार क्र. ९६३ नोंदणी झालेला आहे. सदर फेरफार क्र. ९६३ च्या प्रमाणीत प्रतीस **निशाणी क्र. ७१** देण्यात येते. तसेच भुमापन क्र. ४९३ चा सन २०११–१२ सालच्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर ७/१२ उता–याच्या प्रतीस **निशाणी क्र. ७२** देण्यात येते. मी माझे नावचे संगणकीय विदयुत बिल दाखल केले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर विदयुत बीलास **निशाणी क्र. ७३** देण्यात येते.

**अतिरीक्त सरतपास पुर्ण**

**सर्व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. एल.एस.देशपांडे यांच्यामार्फत वादी साक्षीदार क्र. २चा उलटतपास शपथेवर सुरू**

०२. हे खरे आहे की, मी, सर्व प्रतिवादी असे सर्वजण धानोरा येथील रहिवाशी आहोत. श्रीहरी अदनाक हे प्रतिवादी क्र. २ व ३ चे वडील होते. हे खरे आहे की, सर्व प्रतिवादी शेती व्यवसाय करतात. हे खरे आहे की, वादग्रस्त प्लॉट हा जमीन गट क्र. ४९३ मधील आहे. हे खरे आहे की, जमीन गट क्र. ४९३ ही प्रतिवादींची वडीलोपार्जित जमीन आहे. हे खरे आहे की, जमीन गट क्र. ४९३ क्षेत्र १ हे. ७७ आर ही प्रतिवादींची हिंदु एकत्र कुटुंबाची जमीन आहे. हे खरे नाही की, त्यावर प्रतिवादींची मालकी व ताबा आहे. त्या जमीनीवर सर्व प्लॉट धारकांचा ताबा आहे. माझे शिक्षण १२ वी पर्यत झाले आहे. हे खरे नाही की, माझे पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात नमुद चतु:सिमा या खरेदीखतातील चतु:सिमेप्रमाणे नमुद केलेल्या नाहीत. हे खरे आहे की, मी प्लॉट कागदपत्रे पाहुनच खरेदी केलेला आहे. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ व ३ ची संमती न घेताच प्रतिवादी क्र. १ ने मला प्लॉट विकलेला आहे. माझेकडे संमती घेतल्याचा लेखी कागद नाही. हे खरे आहे की, आम्हा दोघा वादींची प्लॉटींगची जमीन सोडुन इतर जमीन प्रतिवादींची आहे. हे खरे आहे की, प्रतिवादी त्या जमीनीची वहीती करतात. हे खरे आहे की, धानोरा ग्रामपंचायत आमच्या भावकीच्याच ताब्यात आहे. हे खरे आहे की, आबासाहेब आप्पासाहेब पांडे हे धानो–याचे सरपंच आहेत. हे खरे आहे की, काही वर्षापुर्वी माझे वडील देखील धानोरा गावचे सरपंच होते. हे खरे आहे की, प्रतिवादींनी आम्ही दोन्ही

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.01.06 16:57:14 +0530

वादीच्या प्लॉटमधील सोडलेली आठ ते दहा फुटाची मोकळी जागा याचा उल्लेख माझे खरेदीखतात नाही. हे खरे आहे की, तसा वेगळा लेखी करारनामा देखील नाही.

**मध्यांन्नाची सुटटी झाल्याने उलटतपास तहकुब.**

दिनांक –०६/०१/२०२६

समक्ष,

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.01.06 16:57:19 +0530

(श्री.एम.बी.सोनटक्के)
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.01.06 16:57:24 +0530

(श्री.एम.बी.सोनटक्के)
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई

**मध्यान्नाच्या सुटटीनंतर सर्व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. एल.एस.देशपांडे यांच्यामार्फत वादी साक्षीदार क्र. २ चा पुढील उलटतपास शपथेवर सुरू**

३. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त प्लॉटची ग्रामपंचायतला नोंदणी संगमनत करून चुकीच्या पध्दतीने केलेली आहे. हे मला माहीत नाही की, प्रतिवादींनी त्याबाबत वेळोवेळी आक्षेप घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींच्या जागेत आलेल्या घराच्या खिडक्या व सोप बंद करण्याबाबत प्रतिवादीसोबत करारनामा केला होता व त्यावर आमच्या सहया आहेत. हे मला माहीत नाही की, वादी क्र. १ चे देखील बांधकाम पश्चिम दिशेने प्रतिवादींच्या जागेत दिड ते दोन फुट आलेले होते व त्याबाबत देखील प्रतिवादीसोबत करारनामा करण्यात आला होता व त्यावर वादी क्र. १ च्या सहया आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्हा दोन्ही वादींच्या जागेमध्ये सोडलेल्या मोकळया जागेत प्रतिवादींचे शेड अस्तीत्वात आहे व त्यावर त्याची मालकी आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या जागेचे मालक प्रतिवादी असल्याने त्या जागेबाबत आम्हाला उजर करता येणार नाही. मी वादग्रस्त प्लॉटच्या पुर्वेस १०० रूंदीचा रस्ता आला असल्याबाबत कागदपत्र दाखल केलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी तो रस्ता १०० फुटाचा असल्याचे लपवून ठेवले असे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी आमचा प्लॉट गिळंकृत करण्याच्या प्रयत्नात आहेत असे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी आमच्या कब्जे उपभोगास मनुष्यबळाचा वापर करून अडथळा करत आहेत असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२.०८.२०१६ रोजी प्रतिवादींनी आमच्या घरासमोर येवून शिवीगाळ केली व धमकी दिल्याचे

खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील कारण खोटे व काल्पनीक आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.
उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

दिनांक –०६/०१/२०२६

समक्ष,

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.01.06 16:57:29 +0530

(श्री.एम.बी.सोनटक्के)
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.01.06 16:57:33 +0530

(श्री.एम.बी.सोनटक्के)
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई